# वस्तीतील मुलांसोबत अनोखी दिवाळी

**पुणे :** कर्वेनगरमधील सहजानंद सोसायटीच्या आसपास राहणाऱ्या वस्तीतील मुलांसोबत हिंदू महिला सभेच्या सदस्यांनी दिवाळी साजरी केली. सर्व मुलांना दिवाळीच्या फराळाच्या पदार्थांबरोबर जीवनावश्यक वस्तू व खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी आस फाउंडेशनच्या अनघा ठोंबरे , हिंदू महिला सभेच्या सुप्रिया दामले, स्मिता नातू, मृणाल गोडबोले, नीला मोघे, प्राची सप्रे व सुधा लेले या सदस्या सहभागी झाल्या होत्या.